**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिसस/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ दिनांक : २३.०३.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/४९३० दि. २२.०३.२०१९.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती यांजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावर शैक्षणिक संस्था स्तरावरुन मान्यता देणे आवश्यक आहे. याबाबत मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये याबाबत वारंवार सूचना देऊनही अद्यापही अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज कार्यवाहीसाठी शैक्षणिक संस्था स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, **उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जावर शैक्षणिक संस्था स्तरांवरुन कार्यवाही करणेसाठी दि. २५.०३.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर शैक्षणिक संस्था स्तरावर प्रलंबित राहिलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द केले जाणार आहेत.**

**प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नसून, मुदतीनंतर प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार रहातील.**

**विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत अर्ज मंजूर न झाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

स्वाक्षरी/-
**(डॉ. विजय नारखेडे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.